**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष १२, अंक २९]** **गुरुवार, ऑगस्ट २७, २०२६/भाद्रपद ५, शके १९४८** **[पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००**

**असाधारण क्रमांक ६५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.—** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश | **पृष्ठे** १-४ |

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ ऑगस्ट २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XII OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PRIVATE UNIVERSITIES (ESTABLISHMENT AND REGULATION) ACT, 2023.

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२.**

**महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन), अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

२०२४ चा महा. ८. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेतः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ याच्या अनुसूचीची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यास जोडलेल्या अनुसूचीमध्ये, भाग दोन मधील, नोंद १३ नंतर, पुढील नोंदी ज्यादा दाखल करण्यात येतीलः- २०२४ चा महा. ८.

| | | |
|---|---|---|
| "१४. | लता मंगेशकर युनिव्हर्सिटी, मुख्यालय- डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर ४४० ०१९. (आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी) | व्ही एस पी एम अकॅडमी ऑफ हायर एज्युकेशन, ५, वाय.एम.सी.ए. कॉम्प्लेक्स, सीताबर्डी, नागपूर ४४० ००१. |
| १५. | डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ, मुख्यालय- वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट- एम.आय.डी.सी., अहिल्यानगर- ४१४ १११. (महाराष्ट्र). (आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी) | डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन, वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट- एम.आय.डी.सी., अहिल्यानगर- ४१४ १११. (महाराष्ट्र).". |

# निवेदन

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ (२०२४ चा महा. ८) हा, महाराष्ट्र राज्यातील खाजगी विद्यापीठांची स्थापना, विधिसंस्थापन व विनियमन करण्यासाठी अधिनियमित करण्यात आला आहे. त्यामध्ये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांचा समावेश करण्यासाठी आणि आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी खाजगी विद्यापीठाची स्थापना करण्याकरिता तरतूद करण्यासाठी सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० द्वारे उक्त अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ४क मध्ये अशी तरतूद आहे की, ज्या प्रायोजक मंडळाचे, राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) 'अ' व त्यावरील श्रेणीच्या मानांकासह (एकत्रित श्रेणी गुण सरासरी (सीजीपीए) ३.०१ व त्यापेक्षा अधिक), आरोग्य विज्ञान शिक्षण क्षेत्रात वीस वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अनुभव असलेले मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय आहे आणि ज्यामधील किमान पन्नास टक्के विद्याशाखांमध्ये पदव्युत्तर पाठ्यक्रम सुरू आहेत आणि ते किमान दहा वर्षांपासून कार्यरत आहे, केवळ तेच प्रायोजक मंडळ या अधिनियमान्वये आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविणारे विद्यापीठ स्थापन करण्यासाठी अर्ज करण्यास पात्र असेल.

३. आरोग्य विज्ञान पाठ्यक्रम चालविण्यात येणाऱ्या व्ही एस पी एम उच्च शिक्षण अकॅडमी, नागपूर यांची महाविद्यालये, ३५ पेक्षा अधिक वर्षांपासून कार्यरत आहेत आणि त्यांना सीजीपीए ३.३९ सह राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) अ+ श्रेणीचे अधिस्वीकृती मानांकन प्राप्त झालेले आहे. डॉ. बाळासाहेब विखे पाटील फाउंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अहिल्यानगर हे, २२ पेक्षा अधिक वर्षांपासून कार्यरत आहे आणि त्यास सीजीपीए ३.२६ सह राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेचे (नॅक) अ+ श्रेणीचे अधिस्वीकृती मानांकन प्राप्त झालेले आहे. उक्त प्रायोजक मंडळांनी, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांची खाजगी विद्यापीठे स्थापन करण्यासाठी उक्त अधिनियमाअन्वये शासनाकडे अर्ज केलेले आहेत.

४. उक्त अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (४) अन्वये पडताळणी समितीने सादर केलेल्या अहवालाचा विचार केल्यानंतर, शासनाची अशी खात्री पटली आहे की, प्रस्तावित लता मंगेशकर विद्यापीठ, नागपूर आणि डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ, अहिल्यानगर यांच्या उक्त प्रायोजक मंडळांनी उक्त अधिनियमाची कलमे ४क, ५ आणि इतर कलमातील तरतुदींचे अनुपालन केलेले असल्याने, त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये सुधारणा करून, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी खाजगी विद्यापीठे स्थापन करण्याकरिता त्यांना परवानगी देण्यात यावी.

म्हणून, उक्त अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या भाग दोनमध्ये सुयोग्य सुधारणा करून, आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी लता मंगेशकर विद्यापीठ, नागपूर, मुख्यालय- खासरा क्रमांक १२७/१, १२७/५, डिगडोह हिल्स, हिंगणा रोड, नागपूर-४४० ०१९ आणि डॉ. बाळासाहेब विखे पाटील विद्यापीठ, अहिल्यानगर, मुख्यालय - विळद घाट, शासकीय दूध डेअरी जवळ, एमआयडीसी, अहिल्यानगर-४१४ १११ ही खाजगी विद्यापीठे स्थापन करणे इष्ट आहे असे वाटते.

५. उक्त प्रायोजक मंडळांनी, २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांसाठी खाजगी विद्यापीठे स्थापन करण्याचे प्रस्ताव दिले आहेत. २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आरोग्य विज्ञान पाठ्यक्रमांचे प्रवेश सध्या सुरू आहेत.

६. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २७ ऑगस्ट २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बी. वेणुगोपाल रेड्डी,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.